## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०१/२०१७

**१) इसमाचा रेल्वेने कटुन मृत्यु . :—**

दिनांक १८/०१/२०१७ रोजी ०८.०५ वा. दर. यातील मृतक दिपक किसनराज सिरपुरकर वय ३५ वर्ष, रा. बाबाफरीद नगर झिगांबाई टाकळी मनकापुर नागपुर हा रेल्वे पुलीयावर काम करीत असतांना खर्रा व चहा खाण्या–पिण्याकरीता लावेश्वर गावात रेल्वे पुलीया ओलांडुन जात असतांना समोरून ईन्टर सिटी ट्रेन आल्याने मृतक हा रेल्वेने कटुन चेंदांमेदा होवुन मरण पावला व सुर नदीच्या पाण्यात मृकचे तुकडे पडुन मिळुन आल्याने फिर्यादी प्रभुदास किंगाया वय ५९ वर्ष रा. बाबाफरीद नगर झिगांबाई टाकळी मनकापुर नागपुर यांच्य वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. श्रीरामे पो. स्टे. वरठी हे करीत आहे.

**२) आराजाराला कंटाळुन इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक १८/०१/२०१७ रोजी १६.०० वा. दर. यातील मृतक चंद्रहास्य मधुराज बोरकर वय ३५ वर्ष, रा. मुरमाडी हा बेरोजगार व अविवाहीत असुन त्याच्या बरोबरीच्या मुलांचे लग्न झाले परंतु त्याचे आज पावेतो लग्न झाले नाही या गोष्टीचा व जुण्या दमाचे बिमारीचा मनावर परीनाम घेवुन स्वंयपाक खोलीच्या रॅकच्या लोंखडी हुक ला विदयुत वायरने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी सचीन शामराव बोरकर वय ३४ वर्ष रा. मुरमाडी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पो. स्टे. लाखनी हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १८/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९१ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.